N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** औंध

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0242  **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 16/11/2022 03:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From** (दिनांक पासून): 15/11/2022
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 15/11/2022
   **Time From** (वेळेपासून): 16:00 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 16:30 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 15/11/2022  **Time** (वेळ): 17:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 004

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 16/11/2022 03:37 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

दक्षिण, 13 किमी  **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पुसेसावळी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीरा ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जीवन रमेश माळवे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** रमेश माळवे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वंजारवाडी पो पुसेसावळी ,औंध,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वंजारवाडी पो पुसेसावळी ,औंध,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | धनंजय मधुकर भोसले | | वडील का नाम : मधुकर भोसले | 1. काशिळ ,औंध,सातारा,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दि.15/11/2022

मी जीवन रमेश माळवे वय-22 वर्षे, शिक्षण- बी.एस. सी अँग्री व्यवसाय- ईलेक्ट्रानिक दुकान रा.वंजारवाडी पो. पुसेसावळी ता.खटाव जि. सातारा मो.नं 7020203686

समक्ष औंध पोलीस स्टेशन मध्ये हजर होवुन खबरी जबाब देतो की मी वरील ठिकाणी आईवडील व दोन भावासमवेत एकत्रात राहणेस आहे माझे आजोबा श्रीरंग आण्णा माळवे यांचे नावे मौजे कळंबी ता.खटाव जि. सातारा येथे गट नंबर 781 व 782 मध्ये एकुण 12 एकर शेत जमीन आहे .

माझे आजोबा श्रीरंग आण्णा माळवे हे माहे आक्टोबर 2019 मध्ये स्वरगवाशी झाले त्यामुळे आजोबा श्रीरंग आण्णा माळवे यांचे नावे मौजे कळबी ता.खटाव जि.सातारा येथे गट नंबर 781 व 782 मध्ये एकुण 12 एकर क्षेत्राचे वारसा हक्काने नोंद होणे साठी माझे वडील व तीन चुलते याचावारसा हक्काने नोंद होणेचा अर्ज कागदपत्रासह पुसेसावळी तलाठी याचेकडे मागील महिन्यामध्ये दिला होता आमचे घरातील जमीनीचे व्यवहार मीच पाहत असतो त्यानंतर मी तलाठी काटकर यांची मागील आटवडयामध्ये भेट घेतली त्यावेळी तलाठी काटकर यांनी तुमची लनोंद ही फेरफारला घेतली आहे फेरफारची नोंद फायनल मंडल अधिकारी भोसले करतील तुम्ही त्यांची भेट घ्या असे मला सांगितले .

दि.14/11/2022 रोजी मी मंडलाअधिकारी भोसले यांची त्याचे मंडलाअधिकारी कार्यालय पुसेसावळी येथे भेट घेवुन वडीलाचे नावे फेरफार नोंद फायनल करणेबाबत विनंती केली त्यावेळी त्यांनी मला सांगितले कि फेरफार असा फायनल होतो वय तुम्हाला काय आमचे देणे घेणेचे काय बघतोस का नाय तुझ काम उदया पैसाची जुळणी करुन ये असे मला सांगितले त्यावरुन मी त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आलो .

त्यानंतर मी अँन्टी करप्शन ब्युरो सातारा कार्यालयात मंडल अधिकारी कार्यालय पुसेसावळी येथील मंडल अधिकारी भोसले यांचे विरुध्द तक्रार देण्याचे ठरवले व मी दि.15/11/2022रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयास संर्पक साधुन माझी तक्रार असल्याचे सांगितले तेव्हा पोलीस निरीक्षक श्री राऊत साहेब यांनी मला दि. 15/11/2022 रोजी 14.30वा पुसेसावळीच्या अलीकडे घाटमाथा रोडला रोडच्या कडेला आडोशास थांबण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी दि. 15/11/2022 रोजी 14.30वाचे दरम्यान पुसेसावळीच्या अलीकडे घाटमाथा रोडच्या कडेला आडोशास थांबण्याच्या सुचना दिली त्या प्रमाणे मी दि.15/11/2022 रोजी 14.30वा दरम्यान पुसेसावळी च्या अलीकडे घाटमाथा रोडला रोडच्या कडेला आडोशास थांबुन रोहिलो त्यावेळी पोनि राऊत साहेब यांनी माझ्याशी संर्पक साधुन मला घाटमाथा रोडला आले असल्याचे सांगुन ते थांबले ठिकाणी बोलावुन घेतले त्यावेळी श्री राऊत साहेब त्याचे पथक खाजगी वाहनामध्ये हजर होते त्याठिकाणी श्री राऊत साहेबांनी माझी व नगरपरिषद रहिमतपुर येथील 1) श्यामसुंदर पांडुरंग मोरे आंतरगत लेखा परिक्षक व 2 सुरेंद्र छोटुलाल गांगुर्डे संगणक अभियंता या दोन शासकीय पंचाची तसेच सापळा पथकातील पोना राजे व पोना काटकर यांची ओळख करुन दिली त्यावेळी मी माझा लेखी तक्रारी अर्ज राऊत साहेबाकडे हजर केला त्यावेळी माझा तक्रारी अर्ज राऊत साहेबांनी व दोन्ही पंचानी वाचन करुन त्यावर सह्या केल्या.

माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे यांची पडताळणी करण्याचे पोनि राऊत यांनी ठरवले व पंच एक म्हणुन मोरे व पंच दोन म्हणुन गांगुर्डे यांनी कताम करण्याचे ठरवले त्यानंतर मला व पंच नं एक यांना सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डरसह मंडलाअधिकारी भोसले यांची मंडलाअधिकारी कार्यालय पुसेसावळी येथे भेट घेण्यासाठी माझ्या दुचाकी वाहनाने रवाना केले .

मंडलाअधिकारी भोसले यांची भेट घेण्यासाठी मंडलाअधिकारी कार्यालय पुसेसावळी येथे जावुन पडताळणी केली असता त्यामध्ये माझी व मंडल अधिकारी भोसले यांची समक्ष भेट झाली त्यावेळी मंडलाअधिकारी भोसले यांनी माझ्याकडे माझे वडीलांचे फेरफारचे नोंद करणेसाठी 1000 रुपये ची लाचेची मागणी करुन लाच रक्कम लागलीच मंडलाअधिकारी कार्यालय पुसेसावळी येथे आणुन देण्यास सांगितलेचे रेकॉर्ड झालेल्या संभाणावरुन व माझ्या तसेच

पंच नं एक यांच्या हकिगतीवरुन राऊत साहेबाची व दोन्ही पंचाची खात्री झाली.

त्यानंतर राऊत साहेब यांचे सुचनेनुसार मी,1000/-रुपये हजर केले. त्यानंतर राऊत साहेबांनी त्या नोटांचे क्रमाक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्याच रकमेस अंथ्रासीन पावडर लावण्याबाबतची कारवाई खाजगी वाहना मध्ये केली सापळा कारवाई संबधाने राऊत साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या त्यानंतर माझेकडे व्हाईस रेकॉर्डर देवुन पंच नं एक यांना माझे सोबत माझेकडील दुचाकी वाहनाने मंडलाअधिकारी भोसले यांची भेट घेण्याकामी मंडलाअधिकारी कार्यालय पुसेसावळी येथे रवाना केले . राऊत साहेब, पंच नं.2च सापळा पथक असे आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवून खाजगी वाहनाने आले.

"मी. व पंच नं. 1 मोरे असे आपले सुचनेप्रमाणे तसेच माझे माहितीप्रमाणे माझेकडील दुचाकी वाहनावरुन ग्रामपंचायत पुसेसावळी इमारतीमधील मंडलाधिकारी कार्यालयाचे समोर गेलो. त्या ठिकाणी मी कार्यालयाच समोर दुचाकी वाहन उभे केले. आपण व सापळा पथक असे आमचे पाठोपाठ येथुन मंडलाधिकारी कार्यालयाचे बाजूस रस्त्याचे कडेला वाहन उभे करून सर्वजण बाहनातून खाली उतरून मंडलाधिकारी कार्यालयाचे आजुबाजूस कोणास संशय न येईल अशा रितीने थांबून राहिलात त्यानंतर मी व पंच नं.1मोरे असे मंडलाधिकारी कार्यालयासमोर गेलो. त्याठिकाणी मंडलाधिकारी भोसले कार्यालयाचे दरवाजासमोर उभे होते. त्यावेळी मी मंडलाधिकारी भोसले यांना, "ते द्या की कागद, द्या की आण्णासाहेब लागायचे कागद बँकेत" असे म्हणालो. त्यावेळी मंडलाधिकारी भोसले, "इतका वेळ लागतो, तिच सांगतुय तुला इतका वेळ लागतो" असे म्हणाले. त्यावर मी "द्या की" असे म्हणून मंडलाधिकारी भोसले यांचेकडे सातबारा उता-याची मागणी केली. त्यावेळी मंडलाधिकारी भोसले यांनी, "बर चल दे" असे म्हणून माझ्याकडे पाहत त्यांचे डाव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून लाच मागणीचा सूचक इशारा करत उद्याच्याला मिळल कागद" असे म्हणून मंडलाधिकारी भोसले यांनी त्यांचे जवळील डब्याच्या पिशवीची चेन उघडून "टाक यात" असे म्हणून 1000/- लाच रक्कम सदर पिशवी मध्ये टाकण्यास सांगितली. त्यावेळी मी माझे शर्टाचे डावे बाजूच्या खिश्यातील लाच रक्कम उजव्या हाताने काढून सदर पिशवी मध्ये टाकत "उद्याच्याला मिळल का" असे विचारले. त्यावर मंडलाधिकारी भोसले "उद्या घे की सात बारा" असे म्हणाले. त्यानंतर मी मंडलाधिकारी भोसले यांचे जवळुन थोडे बाजुला येवून पोनि राऊत साहेबांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझे डोक्यावरुन डावा हात दोन वेळा फिरवून लाच रक्कम स्विकारल्याचा पूर्व नियोजित इशारा केला. तो इशारा पाहून श्री. राऊत साहेब, पंच नंबर 2 व सापळा पथक असे माझ्याजवळ आले. त्यानंतर राऊत साहेबांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर राऊत साहेब व पथक असे पंच नं.1 यांचेकडे गेले. त्यानंतर राऊत साहेब यांनी मंडलाधिकारी कार्यालयामध्ये पथकाच्या सहाय्याने मंडलाधिकारी भोसले यांच्या तपासण्या केल्या.

त्यानंतर मला राऊत साहेबांनी मंडलाधिकारी कार्यालयात बोलवून माझी देखील अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पे-यास व तळहातास तसेच माझ्या शर्टाचे छातीवरील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर राऊत साहेब यांनी मंडलाधिकारी भोसले यांना ताब्यात घेवून, मला सापळा पथकातील पो.ना. काटकर यांचेसोबत अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे जावुन थांबण्याची सूचना दिली. त्याप्रमाणे मी सापळा पथकातील पो.ना. काटकर यांना सोबत घेवुन माझेकडील दुचाकी वाहनाने अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे येवून थांबुन राहिलो. काहीवेळाने श्री. राऊत साहेब हे मंडलाधिकारी भोसले यांना सोबत घेवुन पथकासह अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे दाखल झाले. त्याठिकाणी श्री. राऊत साहेब यांनी मला अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मला कार्यालयात बोलावुन घेवून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर राऊत साहेबांनी माझे व पंच नं. 1 यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाची स्क्रिप्ट तयार केली व त्यामध्ये नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला कार्यालयामध्ये बोलावून घेवून मला हकिकत विचारली. सदरबाबत सविस्तर यशस्वी पंचनामा अँन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे.

तरी सापळा कारवाईमध्ये लोकसेवक धनंजय मधुकर भोसले, वय 51 वर्ष, मंडलाधिकारी, पुसेसावळी ता.खटाव जि.सातारा, राहणार काशिळ, ता. जि. सातारा यांनी दिनांक 15/11/2022 रोजीचे पडताळणी कारवाईवेळी माझ्याकडे माझे वडीलांचे फेरफारची नोंद फायनल करणेसाठी 1000/- रुपयांची लाच मागणी करुन ती दिनांक 15/11/2022 रोजी 1000/- लाच रक्कम ग्रामपंचायत पुसेसावळी इमारतीमधील मंडलाधिकारी कार्यालयाचे समोर 16.23 वाजण्याचे सुमारास स्विकारली आहे, म्हणून माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dattatray parshuram darade(I (Inspector)) / dgpdpdm8906 — or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): — No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Gmalave.

15 Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

पोलीस स्टेशन ऑफीसर
आंध पोलीस स्टेशन

Name (नाव): dattatray parshuram
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): dgpdpdm8906

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्याची नोंद घेतली जाईल.)